क्र.रिट याचिका०११२/२८७/प्र.क्र.७८/विशा१अ

HOME DEPARTMENT
गृह विभाग
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र शासन
World Trade Centre 1, 30th Floor
जागतिक व्यापार केंद्र १, ३०वा मजला
Cuffe Parade, Mumbai 400 005.
कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Tel.: 2218 8164 Fax : 2215 1733

महाराष्ट्र शासन

**Dr. Amitabh Rajan,** I.A.S.
Additional Chief Secretary (Home)
**डॉ. अमिताभ राजन,** भा.प्र.से.
अपर मुख्य सचिव (गृह)

दिनांक :
Date : २६ मार्च, २०१३

**विषय :- राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.**

प्रिय श्री.

राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा तसेच त्याचा अवमान होऊ नये यासाठी खालील अधिनियम/ संहिता अस्तित्वात आहेत.

१) बोधचिन्ह व नाव ( अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९५० {The Emblems and Names ( Prevention of Improper Use) Act, 1950}
२) राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ {The Prevention of Insults to National Honour Act, 1971}
३) ध्वज संहिता (The Flag Code of India)

या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.एफएलजी १२०७/प्र.क्र.११/०७/३०, दि. २२/८/२००७ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दि.१६/७/२०१२ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने त्यांचे पत्र क्र.फ्लॅग- १०१२/१३१८/३०, दि.७/०८/२०१२ अन्वये सर्व संबंधितांना निर्गमित केल्या आहेत. या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात राज्यात काही गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. या विषयावर मा. उच्च न्यायालयामध्ये हिंदू जनजागृती समितीने जनहित याचिका क्र.१०३/२०११ दाखल केली असून राष्ट्रध्वजाचा अवमान होत असल्याची गंभीर दखल मा. उच्च न्यायालयाने घेतली आहे.

सर्वसाधारणत: प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन इतर राष्ट्रीय कार्यक्रम तसेच विशेष प्रसंगी राष्ट्रध्वजाचा वैयक्तिकरित्या वापर केला जातो. अशा कार्यक्रमांनंतर राष्ट्रध्वज इतस्तत: पडलेले दिसून येतात. अशा प्रकारे राष्ट्रध्वजाची अवहेलना होणार नाही तसेच त्याचा योग्य तो मान राखला जाईल यासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. सबब, यासंदर्भात आपल्या कार्यक्षेत्रातील सामाजिक संस्था, केबल नेटवर्क यांच्या सहकार्याने राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत जनजागृती करण्यासाठी उचित उपाययोजना तात्काळ करावी. त्याचप्रमाणे उपरोक्त सर्व अधिनियम/ आदेश/सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी असे आपणांस याद्वारे कळविण्यात येत आहे.

३०/३/१३

आपला

(अमिताभ राजन)

प्रति,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व पोलिस आयुक्त,
सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक.

RDC
09-06-14

महाराष्ट्र शासन

सक्रीर्ज

अति-तात्काळ / न्यायालयीन कामकाज प्राथम्य
दूरध्वनी व फॅक्स क्र. २२१८८१२९/२२१८८११५
ई मेल - home_special1a@maharashtra.gov.in

क्र.[०३१३/७१४/प्र.क्र. ६२/विशा १ अ
गृह विभाग, ७ वा मजला,
जागतिक व्यापार केंद्र-१, कफ परेड,मुंबई-५
दिनांक :- २० मे, २०१४.

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन नवी मुंबई ४०० ६१४
दिनांक 27 MAY 2014
आवक क्रमांक ...
शाखा POL

विषय - जनहित याचिका क्र. १०३/२०११
हिंदू जनजागृती समिती वि. महाराष्ट्र शासन व इतर
राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत

संदर्भ - विभागाचे पत्र क्र. रिट याचिका ०११२ / २८७ / प्र.क्र. ७८ / विशा १ अ, दि. २६.३.२०१३

सरकारकून (सामान्य प्रशासन) कोकण विभाग

सर्व जिल्हा दंडाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त व सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना सामाजिक संस्था , केबल नेटवर्क यांच्या सहकार्याने राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत जनजागृती करण्यासाठी उचित उपाययोजना तात्काळ करावी त्याचप्रमाणे सर्व अधिनियम / आदेश / सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, असे संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्वरित संदर्भासाठी संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

2640
30/5/2014

मा. न्यायालयाने सदर याचिकेसंदर्भात शासनाने केलेल्या सर्व उपाययोजनांबाबतची माहिती अतिरिक्त प्रतिज्ञापत्रामार्फत मा. न्यायालयास सादर करणेबाबत आदेशित केले आहे. सदर प्रतिज्ञापत्र दि. १३.६.२०१४ पूर्वी सादर करावयाचे आहे. याचिकेची पुढील सुनावणी दि. २०.६.२०१४ रोजी ठेवण्यात आली आहे. मा. न्यायालयाच्या दि. ११.४.२०१४ च्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

360

सबब, उपरोक्त प्रकरणी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा संकलित फलनिष्पत्ती अहवाल (compliance report ) आपल्या अधिनस्त घटक कार्यालयांकडून प्राप्त करुन आपणांस हे पत्र मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत शासनास सादर करावा, अशी विनंती आहे. सदर न्यायालयीन प्रकरणावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याने कृपया सदर प्रकरणास अग्रक्रम द्यावा, अशीही विनंती आहे.

भा.बा.इंगळे

(भा. बा. इंगळे)

कक्ष अधिकारी, गृह विभाग.

सहपत्र - वरीलप्रमाणे.

2PC



IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
CIVIL APPELLATE JURISDICTION

PUBLIC INTEREST LITIGATION NO.103 OF 2011

| Office Notes, Office Memoranda of appearances, Court's orders or directions & Registrar's orders. | Court's or Judge's orders |
| --- | --- |

Mr. Anand S. Patil for the Petitioner.
Mr. A.B. Vagyani, Additional Government Pleader for the respondents.

CORAM: A.S. OKA &
A.A. SAYED, JJ.
DATED : APRIL 11, 2014.

P.C. :

1 Heard learned Counsel appearing for the Petitioner.

2 We have perused affidavit of Shri Amitabh Rajan, Additional Chief Secretary, Home Department affirmed on 19th March, 2013. We must state that apart from the assurances there is nothing concrete in the said affidavit. We permit Additional Chief Secretary to file further affidavit



::: Downloaded on - 07/05/2014 14:14:12 :::

Bombay High Court

giving all particulars regarding the action taken by the State. The State can always take assistance of NGO's, College and School students for the purpose of spreading awareness.

3 Additional Affidavit to be filed on or before 13th June, 2014. We permit amendment to be carried out to the Petition by adding Union of India as a party respondent no.6. Amendment to be carried out within three weeks from today.

4 Place the Petition for admission on 20th June, 2014. In the meanwhile, issue notice to the added Respondent.

5 In addition to service through Court, petitioner to serve private notice.

(A.A. SAYED, J.) (A.S. OKA, J.)

katkam.

Bombay High Court



::: Downloaded on - 07/05/2014 14:14:12 :::